प्रेस नोट दिनांक ०९/०६/२०२२

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर विभागाने तीन लोकसेवकांना लाचेच्या रक्कमेची मागणी व लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो /घटक | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | --- |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | **१) शंकर रामचंद सोहंदा, लिपीक, कर विभाग, २) भानू अशोक परमार, प्रभारी कर निरीक्षक, ३) बलराम प्रितमदास गिदवानी, लिपीक, कर विभाग, तिन्ही नेमणुक उल्हासनगर महानगरपालिका** |
| मागितलेली लाचेची रक्कम | **५,०००/- रुपये** |
| स्विकारली लाचेची रक्कम | **स्विकारलेली ५,०००/- रुपये** |
| थोडक्यात हकीकत | यातील तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. ०९/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक **शंकर रामचंद सोहंदा** यांनी तकारदार यांचेकडे त्यांचे घराचा प्रॉपर्टी टॅक्स (कर) त्यांचे नावे करण्याकरीता ५०००/- रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याअनुषंगाने आज दि. ०९/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तकारदार हे लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता उल्हासनगर ४ मार्केटमध्ये गेले असता, लोकसेवक शकर सोहंदा, लोकसेवक भानु परमार व लोकसेवक बलराम गिदवानी हे त्यांचेकडील असलेल्या महानगरपालीकेचे ओमनी कार मध्ये बसलेले दिसुन आले. त्यावेळी तकारदार हे नमुद लोकसेवक यांना भेटले असता, **लोकसेवक भानू अशोक परमार** यांनी तकारदार यांचेकडे पडताळणी दरम्यान निष्पन्न झालेल्या ५०००/- रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केली व सदरची रक्कम लोकसेवक शंकर सोहंदा, लिपीक उल्हासनगर मनपा यांचेकडे देणेबाबत तकारदार यांना सांगितले. त्यानुसार तकारदार यांनी लोकसेवक शंकर सोहंदा यांचेसमोर ५०००/- रु. लाचेची रक्कम धरली असता त्यांनी सदरची रक्कम स्विकारुन त्यांचे शर्टचे समोरील खिश्यामध्ये ठेवून दिली. त्यानंतर लागलीच सदरची स्विकारलेली लाचेची रक्कम लोकसेवक शंकर सोहंदा यांनी सदर ओमनी कारमध्ये बसलेले **लोकसेवक बलराम प्रितमदास गिदवानी** यांचेकडे दिली असता, त्यांनी नमुद ५,०००/-रु लाचेची रक्कम त्यांनी स्विकारुन त्यांचेकडील तकारदार यांचे घराचे कागदपत्रामध्ये ठेवुन दिली. सदर वेळी तकारदार यांनी पुर्वनियोजीत इशारा केला असता, नमुद तिन्ही लोकसेवक यांना पंचांचे समक्ष सापळा पथकाने रंगेहात पकडण्यात आले आहे. सदरबाबत पुढील कारवाई विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे चालू आहे. |

**मार्गदर्शनअधिकारी- मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले, सो. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :- लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेत स्थळ :-acbmaharastra@mahapolice.gov.in

ईमेल-spacbthane@mahapolice. Gov.in,

अॅप्लीकेशन -acbmaharastra.net

टोल फ्रि नंबर -१०६४

दुरध्वनी कमांक -०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटसअॅप् कमांक -९९३०९९७७००

दिनांक :- ०९/०५/२०२२

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

सत्यमेव जयते

ASPatil

( अश्विनी पाटील )

पोलीस उप अधीक्षक,

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.